# आपल्या छंदाचे व्यवसायात रूपांतर करणारी हास्य कलाकार



चैताली माजगांवकर –भंडारी

अनेक जणांना लहानपणी काही ना काही छंद, आवड किंवा कला असतात. पण पुष्कळ जणांच्या बाबतीत जस जसे वय वाढत जाते व इतर जबाबदाऱ्या वाढत जातात या छंदाकडे दुर्लक्ष होऊ लागते. पण असे काही लोक आहेत की ते आपले छंद जोपासतात, वाढवतात व त्याचे यशस्वी व्यवसायात रूपांतर करतात. अशाच एक आहेत पुण्याच्या सौ. चैताली माजगांवकर–भंडारी.

एकपात्री प्रयोग हा नाटय प्रकार मराठी रसिकांना नवीन नाही. त्यातीलच विनोदी एकपात्री नाटय प्रकार फारच पॉप्युलर झाले आहेत. नकला, विनोद, हास्य प्रसंग, विनोदी गाणी, चुटके इत्यादी प्रकारांनी हे प्रयोग चांगलेच मनोरंजक होत असतात. पण आज तरी या क्षेत्रात पुरुषांची मक्तेदारी आहे. हाताच्या बोटावर मोजता येतील एवढया फारच थोडया महिला कलाकार या क्षेत्रात कार्यरत आहेत. चैताली ही अशीच एक आघाडीची महिला कलाकार आहे.

चैतालीचा जन्म १९८२ मध्ये सातारा येथे एका कलाकार कुटुंबातच झाला.वडील जरी महाराष्ट्र स्कूटर्स मध्ये नोकरी करत होते तरी ते नकलाकार म्हणून प्रसिध्द होते तर तिचे काका जादूगार म्हणून प्रसिध्द होते. त्यामुळे तिच्या वडिलांचे व काकांचे नकलांचे व जादूचे स्टेज शोज नियमितपणे होत असायचे. चैताली ही तीन बहिणीमधील सर्वात धाकटी मुलगी. त्यामुळे तिला पण लहानपणापासूनच नकलांचा छंद लागला होता शाळेत असताना वक्तृत्व स्पर्धेत पण नियमितपणे भाग घ्यायची. त्यामुळे लहानपणापासूनच अंगात सभाधीटपणा आला होता. तिचे १२ वी पर्यंतचे शिक्षण सातारा येथे झाले. पुढे तिने आपल्या आवडीचा व आपल्या छंदांना आधारभूत ठरेल असाच कोर्स निवडला. तिने पुणे विद्यापीठाच्या ललित कला केन्द्रातून बी.ए. कलाशास्त्र हा कोर्स पूर्ण केला. त्यांनतर तिने दोन वर्षे मुंबईला जाऊन टि.व्ही सिरियल्स, चित्रपट किंवा व्यावसायिक रंगभूमीवरील नाटकातून काम करायला मिळावे यासाठी स्ट्रगल पण केला. पण तेथे काही मनासारखे यश मिळाले नाही. पण त्यामुळे ती खचून गेली नाही. २००७ मध्ये लग्न झाल्यावर पुण्यात स्थायिक होण्याचा निर्णय घेतला व स्वत:चे एकपात्री हास्य प्रयोग व वडिलांबरोबर द्विपात्री हास्य प्रयोग करायला

उल्हास हरी जोशी, पुणे

मुलुस्तकात केली. 



सुरुवात केली.

चैत्रालीला काही वर्षे पुण्यातील प्रसिध्द ॲटोमोबाईल डिलर्सकडे नोकरी करण्याची संधी मिळाली. यामध्ये तिने विक्री कौशल्याचा व मार्केटिंगचा अनुभव मिळवला. हा अनुभव तिला तिच्या व्यवसाय वृध्दीसाठी उपयोगी पडेल हे तिने अचूक ओळखले व त्या दृष्टीने प्रयत्न पण करायला सुरुवात केली.

आपल्या कार्यक्रमाचा दर्जा उत्तम असावा हा तिचा पहिल्यापासून कटाक्ष आहे. लोकांचे निखळ मनोरंजन व्हावे, विनोदांच्या दर्जा उच्च असावा. चेष्टा असावी पण कुचेष्टा नसावी सादरीकरण उत्तम असावे. लोकांच्या भावना दुखावल्या जाणार नाहीत याची काळजी घ्यावी यासाठी ती प्रचंड मेहनत घेत असते. प्रत्येक कार्यक्रमात लोकांना काहीतरी नवीन देण्याचा तिचा प्रयत्न असतो. यातूनच गेम्स शो ही एक आगळी वेगळी कल्पना निघाली. होम मिनिस्टर हा मराठी टि.व्ही. वरील प्रोग्रॅम प्रचंड लोकप्रिय झाला आहे. त्या प्रोग्रॅमच्या शेवटी वहिनी साठी जो खेळ किंवा गेम्स दाखवितात त्याच प्रकारच्या गेम्सवर आधारित हा प्रोग्रॅम आहे. हा प्रोग्रॅम प्रचंड लोकप्रिय होत असून अनेक महिला उत्स्फूर्तपणे या गेम्समध्ये भाग घेतात असे चैतालीचे म्हणणे आहे. या गेम्स वर लौकरच ती एक पुस्तक प्रकाशित करणार आहा. हास्य सम्राट या टि.व्ही. रिॲलिटी शोमध्ये ती सेमी फायनल पर्यत पोचली होती. मार्केटिंगसाठी तिने सर्व आधुनिक तंत्रज्ञानाचा उपयोग करायला सुरूवात केली आहे. तिचे वेब पेज असून ती फेसबुक, आर्कुट, ट्विटरवर सगळीकडे आहे. आज महाराष्ट्रभर तिचे गंमत जंमत या नावाने प्रोग्रॅम्स चालू असून त्याचे शेकडो प्रयोग झाले आहेत. ती आता सूत्र संचालन कार्यशाळेचा नवीन उपक्रम सुरू केला असून जवळजवळ ३०० जणांनी याचा फायदा घेतला आहे. एप्रिल महिन्यात खास मुलांसाठी या कार्यशाळेचे आयोजन करण्याची तिची योजना आहे. आज तिचे वय केवळ २८ आहे आणि परदेशी झेप घेण्याची तिची महत्वाकांक्षा आहे.

तिला जे काही थोडेफार यश प्राप्त झाले आहे. त्याचे श्रेय ती सर्वात प्रथम आपल्या आई वडिलांना, सासुबाईना व इतर कुटुंबियांना देते. तिच्या पतीचे तर तिला नेहमीच प्रोत्साहन मिळत आले आहे. पण तिच्या या प्रवासात तिला मकरंद टिळ्कू अमीत गोरखे, शैलेश लेले या जेष्ठ आणि श्रेष्ठ कलाकारांचे जे सहकार्य व मार्गदर्शन मिळाले याचा ती कृतज्ञतापूर्वक उल्लेख करायला विसरत नाही.

तिला अशीच यशाची उत्तुंग भरारी घेता यावी हीच सदिच्छा!

********